# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी –(०२१८९) २३३००१** **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

### (७८) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक २६/०२/२०२१

| मागील आठवडयातील हवामान (दि.२०.०२.२०२१ ते २६.०२.२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.२७.०२.२०२१ ते ०३.०३.२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २७ | २८ | ०१ | ०२ | ०३ |
| -- | -- | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी.) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३०.० | ३१.१ | ३१.७ | ३२.४ | ३४.७ | ३५.४ | ३६.१ | कमाल तापमान (अं. से.) | ३७.० | ३७.० | ३७.० | ३७.० | ३७.० |
| १४.९ | १८.१ | १३.८ | १६.१ | १७.६ | १९.० | २०.५ | किमान तापमान (अं. से.) | २१.० | २१.० | २२.० | २१.० | २१.० |
| अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढग स्थिति (आकाश ) | अंशतः ढगाळ | निरभ्र | निरभ्र | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ५९ | ६२ | ७७ | ६३ | ४७ | ४९ | ४७ | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | २८ | २४ | २१ | २० | २१ |
| ३८ | २९ | ३९ | २४ | २६ | २४ | २२ | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | १३ | ११ | ११ | ११ | ११ |
| ३.७ | ४.८ | ६.३ | ३.७ | ३.७ | ३.४ | ३.७ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १५.० | १५.० | १५.० | १५.० | १५.० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २६ फेब्रुवारी ते ०२ मार्च २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान २१ अंश सेल्सिअस ते २२ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी १५ कि.मी. पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ पक्व झालेली रब्बी पिके ज्वारी, गहू , हरभरा, करडई इत्यादींची काढणी करून घ्यावी.<br>➢ काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ शेतकरी बंधूंनी हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामानाचा पूर्वानुमान करिता मेघदूत मोबाईल ॲप चा वापर करावा .<br>➢ तसेच शेतकरी बंधूंनी मेघगर्जना व विजेचा पुवानुमानाकरिता दामिनी ॲपचा वापर करावा. |
| **संदेश** | | पक्व झालेली रब्बी पिके ज्वारी, गहू , हरभरा, करडई इत्यादींची काढणी करून घ्यावी. |
| **हरभरा** | **काढणी अवस्था** | हरभरा पिक ११० ते १२० दिवसांमध्ये तयार होते. पिक ओलसर असताना काढणी करू नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करून घ्यावी. यानंतर धान्यास ६-७ दिवस कडक ऊन द्यावे. हरभरा कोठीमध्ये साठवून ठेवावा. त्यामध्ये कडूलिंबाचा पाला (५%) घालावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. बागायती हरभरा पिका मध्ये घाटे अळी आढळून आल्यास इमामेक्टीन बेंझोएट (५ एसजी) ०.४ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| **गहू** | **काढणी अवस्था** | जिरायती गहू परिपक्व झाला असल्यास काढणी करून घ्यावी. काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. उशिरा लागवड केलेल्या गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच प्रोपिकोनॅझोल १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोनवेळा फवारणी करावी. |
| **करडई** | **काढणी अवस्था** | रब्बी करडई पिकाची काढणी कंबाईन हार्वेस्टर द्वारा करून घ्यावी. करडईचे बियाणे पुढील हंगामात वापरावयाचे असल्यास पंख्याचा वेग ६०० ते ७०० आर. पी. एम. इतका ठेऊन धान्य स्वच्छ करून घ्यावेत व उन्हात वाळवून कोरड्या जागी साठवणूक करावी. |
| **उन्हाळी सूर्यफुल** | | उन्हाळी सूर्यफुलांच्या पिकास संवेदनशील अवस्थेत पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. सूर्यफूलाच्या संवेनदानक्षम अवस्था: १. रोप अवस्था २. फुलकळी अवस्था ३. फुलोऱ्याची अवस्था ४.दाणे भरण्याची अवस्था या संवेदनशील अवस्थेत पाण्याचा तान पडू देऊ नये. फुलकळी अवस्था ते दाणे भरणे अवस्थेत पाण्याचा तान पडल्यास दाणे पोकळ राहतात व उत्पादनात घट होते. |
| **उन्हाळी भुईमूग** | | उन्हाळी भुईमुगास फुले येण्याची अवस्था (पेरणीनंतर २० ते ३० दिवस), आऱ्या सुटण्याची अवस्था (४० ते ४५ दिवस) आणि शेंगा पोसण्याची अवस्था (६५ ते ७० दिवस) या अवस्थांमध्ये संरक्षित पाण्याची पाळी द्यावी.<br>भुईमूग पेरणीनंतर ४ ते ५ दिवसांनी एक पाणी (आंबावणी) द्यावे, म्हणजे राहिलेले बियाणे उगवून येईल. नंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसाचे अंतराने १० ते १२ वेळा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. आऱ्या जमिनीत जाण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याचा कालावधीत पाण्याचा तान पडू देवू नये. |
| **ऊस** | **पूर्व हंगामी – खत व्यवस्थापन** | उसाचे अधिक उत्पादन, पाण्याचा व खतांचा कार्यक्षम वापर आणि अधिक आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत खतमात्रेच्या ८०% विद्राव्य खते दर आठवड्यातून एकदा या प्रमाणे २६ हप्त्यांमध्ये ठिबक सिंचनातून द्यावीत. पूर्व हंगामी ऊस पिकास ठिबक सिंचनातून विद्राव्य खते देण्याचे वेळापत्रक (प्रती आठवडा प्रती हेक्टर) : |

# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

**दूरध्वनी –(०२१८९) २३३००१** **ईमेल**-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | **१ ते ४ आठवडे** नत्र ३० किलो स्फुरद ९ किलो पालाश ९ किलो<br>**५ ते ९ आठवडे** नत्र ७० किलो स्फुरद ३२ किलो पालाश १४ किलो<br>**१० ते २० आठवडे** नत्र १०० किलो स्फुरद ५१ किलो पालाश ३२ किलो<br>**२१ ते २६ आठवडे** पालाश ३७ किलो |
| **ज्वारी** | **काढणीची अवस्था** | रब्बी ज्वारी मध्ये पुढील लक्षणे दिसून येताच काढणी करावी:<br>ज्वारी काढणीच्या वेळी कणसातील दाणे टणक होतात. दाणे खाऊन पाहिल्यास प्रथम फुटताना टन असा आवाज येतो आणि ज्वारी पिठाळ लागते. तसेच ज्वारीचे बारकाईने निरीक्षण केल्यास दाण्याच्या टोका कडील भागा जवळ काळा ठिपका आढळून येतो. तसेच मळणी झालेले धान्य दोन ते तीन वेळा चांगले उन्हात वाळवावेत (धान्यातील ओलावा १० % पेक्षा कमी असावा) तसेच साठवणूक करताना त्यामध्ये १ ते २ टक्के वाळलेला कडूनिंबाचा पाला मिसळून साठवणूक करावी. |
| **टरबूज/खरबूज** | | नाग अळीच्या नियंत्रणासाठी प्रोपेनोफोस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फळ माशीच्या नियंत्रणासाठी क्युलूर चे एकरी ५ सापळे लावावेत. |
| **डाळिंब** | **फळ पक्वता** | पाऊस झाल्यानंतर बोरीक ॲसिड (२ ग्रॅम प्रती लिटर) + झिंक सल्फेट (२.५ ग्रॅम प्रती लिटर) +कॅल्शीयम हायड्रॉक्साइड / चुना (१.२५ ग्रॅम प्रती लिटर) + मॅन्कोझेब (२.५ ग्रॅम प्रती लिटर). पहिल्या फवारणीच्या एका आठवड्यानंतर युरिया (२.५-५ ग्रॅम प्रती लिटर) + कार्बेंडाझिम (१ ग्रॅम प्रती लिटर). दुसऱ्या फवारणीच्या वेळी १० ते १२ दिवसांनी (चिलेटेड) सूक्ष्म अन्नद्रव्ये २-३ ग्रॅम प्रती लिटर याप्रमाणे फवारावे. डाळिंब बागेत रस शोषक किटकांचा प्रादुर्भाव जास्त आढळल्यास लॅमडा सायह्यालोथ्रीन (५ ईसी) ०.६ मिली किंवा सायॲण्ट्रानिलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मिली किंवा थायमीथोक्झाम (२५ डब्लू जी) + स्प्रेडर स्टिकर प्रती लिटर पाणी प्रमाणे फवारावे. |
| **द्राक्ष** | **बेरी पक्वता** | सध्याच्या हवामानातल्या अधिकतम आणि न्यूनतम तापमानातील तफावातीमुळे द्राक्ष बागेतील पिठ्या ढेकण्याच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेजिन २५ % एससी १५ मिली अथवा व्हरटी सिलियम लेक्येनि ५० ग्रॅम + ५० मिली दूध १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **केळी** | **फळ धारणा** | झाडे पडू म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पट्ट्यांच्या सहहयाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. केळी पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी केळीचे घड ६ % सच्छीद्रतेच्या पॉलीथिन पिशव्यांनी झाकावेत. मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यांसारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | उन्हाळी हंगामात जनावरांना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका या चारा पिकांची लागवड करावी. शेळ्या करिता लिव्हर फ्लूक (चपटे कृमि) जंतांच्या नियंत्रणासाठी पशूवैद्यकाच्या सहहयाने जंतनाशक पाजावे. जनावरांना नेहमी स्वच्छ पाणी पिण्यास द्यावे. उसाचे वाढे जनावरांना जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. खाऊ घालायचे असल्यास प्रती दिवस एका जनावरास केवळ ८ किलो वाढे आणि त्यासोबत सकस द्वीदल वर्गातील हिरवा चारा, गरजेनुसार वाळलेला चारा व आंबावण तसेच २५ ते ३० ग्रॅम क्षार मिश्रण देणे अत्यंत गरजेचे आहे. |

**स्त्रोत :**
**१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान :विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.**

ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.
दि. : २६ फेब्रुवारी २०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.**